Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 108 – 109

DOI: 10.5281/zenodo.8348136

Original Research Article

# मंतरलेले दिवस: मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या काळातील आठवणी

श्री जीवन माधवराव देशपांडे

सेवानिवृत शिक्षक, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१००५ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author Phone*: +९१-९३७१६११८८०

Received: 14 September, 2023 | Accepted: 15 September, 2023 | Published: 16 September, 2023

**महत्वाचे शब्द:** मराठवाडा मुक्तिसंग्राम, निजाम राजवट, हैदराबाद संस्थान, रजाकार, पोलीस ॲक्शन

मी राहणार बिलोली, जि. नांदेड येथील असून माझा जन्म दि. २०डिसेंबर १९३९ रोजी झाला. मी तिसऱ्या वर्गात असेन, तेव्हा “पोलीस ॲक्शन” नावाची मोहिम राबविण्यात आली. दि. १७ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारची सैन्य हैद्राबाद संस्थानात घुसले. त्यावेळी भारत सरकारचे गृहमंत्री होते, श्री. सरदार वल्लभभाई पटेल. त्यांनी मेजर जनरल जे. एन. चौधरी (जितेंद्रनाथ चौधरी) हयांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्य पाठवून निझामच्या हैद्राबाद संस्थानचं इंडियन युनियन मध्ये सामीलीकरण करुन घेतलं. येथे नमूद करावयाचे आहे की, भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटीशांच्या तावडीतून स्वतंत्र झाला, तरी निझाम संस्थानला त्यात सामील न होता स्वतंत्र देश व्हायचं होतं, लातूरचे वकील कासीम रझवी याची ती योजना होती. त्याने निझामाला अंकित करुन एक अर्ध सैनिक दल रझाकार नावाचे स्थापन करुन हिंदुवर अत्याचार करायला सुरुवात केली होती. परंतू पुढे संघर्षानंतर भारत सरकारच्या कार्यवाहीमुळे हैद्राबाद संस्थान, ज्यात मराठवाडा होता, दि. १७ सप्टेंबर १९४८ रोजी मुक्त झाला. त्या प्रित्यर्थ ७५ वा मुक्ती दिनाचा अमृत महोत्स्व आपण दि. १५ ते १७ सप्टेंबर २०२३ पर्यंत साजरा करत आहोत.

भारत सरकारचे सैन्य येण्यापूर्वी आम्ही प्लेगमुळे शेतात राहण्यासाठी होतो. आम्ही ज्या शेतात रहायला गेलो होतो तो मळा होता वकील कै. म्हाळप्पा पटने यांचा. ते होते माजी आमदार, श्री. गंगाधर पटने यांचे वडील. सर्व गाव रिकामं झालं होतं. पटने यांचं कुटूंब व आम्ही एकत्र राहत होतो.

तेव्हा रझाकारचा जमाना होता. स्टेट काँग्रेसची हैद्राबाद मुक्तीची चळवळ जोरात होती. धर्माबाद येथील रेल्वेस्टेशन मास्तरचे नातलग श्री. गोविंदराव पानसरे त्या चळवळीत होते. त्यांना एका प्रकरणात अटक झालेली असतांना बिलोली कोर्टातून जामीन मिळाला होता आणि ते सायंकाळी बैलगाडीने सोबतच्या सहकाऱ्या बरोबर धर्माबादला निघाले होते. मुन्सफ होते श्री.रामराव जानीब. त्यांनी व कै. नारायणराव केसराळीकर माजी आमदार यांनी त्यांना सायंकाळी प्रवासास न जाण्याचा आग्रह केला. पण त्यांनी ते मानलं नाही. कारण नियतीला ते मान्य नव्हतं. त्यांची गाडी अर्जापूर जवळ येताच दोन-तीन रझाकर जे कुंडलवाडीचे होते, त्यांनी गाडी रोखली व त्यातील लोकांना विचारुन गोविंदराव पानसरे कोण आहेत असे विचारत त्यांचा खून केला, जेथे आज हुतात्मा गोविंदराव पानसरे कॉलेज आहे. तेथे त्यांची समाधी आहे. तेंव्हा त्या समाधीजवळ दर सोमवारी यात्रा भरत असे. अशाच एका यात्रेस समाधी दर्शनासाठी आम्ही बैलगाडीने वडिलांसोबत पटने कुटूंबासह गेलो होतो. गाडी शेतात सोडली. इतक्यात गोळीबाराचा आवाज ऐकूं येवू लागला. तसेच आम्ही गाडी जुंपली व परत आलो. तो होता बिलोलीच्या कुख्यात पोलीस आमीन झैदी यांने गोळीबार केलेल्या गोळयांचा. कारण कै. अनंत भालेराव व इतर काँग्रेसचे कार्यकर्ते औरंगाबादहून आले असून त्यांना सभा घ्यायची होती. त्या गोळीबारात काही निष्पाप लोकांचे जीव गेले.

पुढे प्लेग कमी झाला व आम्ही सर्व गावकरी गावात राहण्यास आलो असता भारतीय सैन्य हैद्राबाद संस्थानात घुसल्याचे कळले. पैकी एक सैनिक आम्ही बाहेर खेळत होतो तेथे येऊन त्याने शाळा आणि हेडमास्तर कोण आहेत अशी विचारणा आम्हांस केली. आम्ही त्यांना शाळा आणि हेड मास्तर श्री. भिकू हजरत नावाचे याचं घर दाखवलं. हेड मास्तारांना बाहेर बोलावून त्यांनी शाळेवर झेंडा का लावला नाही अशी विचारणा केली व जय हिंद म्हणावयास लावले. हेड मास्तर लुंगीवरच बाहेर आलेले. त्यांनी थरथर कापत झेंडा नाही साहेब म्हणताच सैनिक त्यांच्या आवाजात दरडावून बोलले की, झेंडा नसेल तर तुमची लुंगी फाडून लावा. हेड मास्तर घाबरलेले होते. नंतर शाळेवर झेंडा फडकाविण्यात आला.

सायंकाळी आम्ही समवयस्क मुलांनी ॲड.कै.बापूराव बिलोलीकर यांच्या नेतृत्वाखाली झेंडा घेवून पहिली मिरवणूक काढली व तहसील कार्यालयापर्यंत गेलो. गावच्या नागरिकांची मिरवणूक दुसऱ्या दिवशी निघाली. भारतीय सैन्याचा पाहारा तहसील व पोस्ट ऑफिस येथे होता. पुढे मे. ज. जे. एन. चौधरी हे दौऱ्यावर असतांना बिलोली येथे थांबले होते. त्यांचा बसस्टँण्ड (जुने) येथे गावकऱ्यातर्फे सत्कार झाला. या सर्व आठवणी विलक्षण आहेत. या आठवणींना ७५ व्या मराठवाडा मुक्ती दिनाच्या निमित्ताने उजाळा मिळाला.